दि. २७.१२.२०२३

# प्रेस नोट

**आरोपी लोकसेवक तोडकरी उमेश प्रकाश , वय ४२ वर्षे, धंदा-नोकरी, पद- तलाठी, नेमणुक- तहसील कार्यालय, उदगीर, (प्रतिनियुक्ती) उपविभागीय कार्यालय, उदगीर वर्ग ३ यांनी लाचेची मागणी करुन लाच स्विकारल्यावरुन गुन्हा.**

यातील आरोपी लोकसेवक उमेश प्रकाश तोडकरी तलाठी यांनी तक्रारदार यांच्या काकुच्या नावे मौजे हणमंतवाडी (दिवर्जन) ता. उदगीर, जि. लातूर येथील गट नं. १०१ मधील शेती पाझर तलावासाठी संपादीत शेतजतीनीचा मावेजाची रक्कम खात्यावर जमा झाल्याचा मोबदला म्हणुन व पुढील अधिकचा मावेजा मिळणेकरीता अपिलाची फाईल त्रुटी न काढता पाठविण्यासाठी मदत व मार्गदर्शन करतो म्हणुन ५,०००/- रु ची लाचेची मागणी केली असले बाबतची तक्रार दि. २६/१२/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर या कार्यालयाकडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या कडून दि. २७/१२/२०२३ रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, वरील प्रमाणे प्राप्त तक्रारी नुसार तलाठी उमेश प्रकाश तोडकरी यांनी तक्रारदार यांच्या काकुच्या नावे मौजे हणमंतवाडी (दिवर्जन) ता. उदगीर, जि. लातूर येथील गट नं. १०१ मधील शेती पाझर तलावासाठी संपादीत शेतजतीनीचा मावेजाची रक्कम खात्यावर जमा झाल्याचा मोबदला म्हणुन व पुढील अधिकचा मावेजा मिळणेकरीता अपिलाची फाईल त्रुटी न काढता पाठविण्यासाठी मदत व मार्गदर्शन करण्यासाठी **काय दयायचे ते दया..** असे म्हणुन वर नमुद तक्रारी प्रमाणे लाचेची मागणी केल्याचे पंचासमक्ष लाच पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले.

त्यानुसार लागलीच आज दि. २७/१२/२०२३ रोजी तक्रारदार हे आरोपी लोकसेवक तोडकरी यांना लाचेची रक्कम देण्यासाठी उपविभागीय अधिकारी कार्यालय, उदगीर येथील भुसंपादन विभाग येथे गेले असता आलोसे तोडकरी यांनी पंचासमक्ष लाचेची रक्कम स्विकारली त्यावेळी त्यांना लाचेच्या रक्कमेसह जागेवरच रंगेहाथ पकडण्यात आले.

तक्रारदार यांचे फिर्यादीवरुन लोकसेवक तलाठी उमेश तोडकरी यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन उदगीर ग्रामीण, ता. उदगीर जि. लातूर येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास श्री. भास्कर पुल्ली, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड व मा. रमेशकुमार स्वामी, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनानूसार ला.प्र.वि. लातुर चे पोलीस उप अधीक्षक पंडीत रेजितवाड, पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, पोह/फारुक दामटे, भागवत कठारे, शाम गिरी, भिमराव आलुरे, पोकॉ/शिवशंकर कच्छवे, मपोकॉ/रुपाली भोसले पोकॉ/दिपक कलवले, संदीप जाधव, मंगेश कोंडरे, गजानन जाधव, चापोना/संतोष क्षिरसागर यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

१) डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक :- मोबाईल क्रमांक ०९६२३९९९९४४
२) श्री. पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक :- मोबाईल क्रमांक ०९३०९३४८१८४
३) टोल फ्री :- १०६४
४) हेल्पलाईन क्रमांक कार्यालयाचा फोन क्रमांक :- ०२४८२-२४२६७४
५) Website :- www.acbmaharashtra.gov.in
६) Mobile App :- www.acbmaharashtra.net
७) Facebook Page :- www.facebook.com/MaharashtraACB
८) TTwitter :- ACBlatur
९) Instagram :- Acblatur
YouTube Channel :- anticurruptionbureaulatur1584

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

Scanned with CamScanner